**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७**
**(दि. ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित)**
**नुसार योजनेच्या अंमलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग/रोहयो प्रभाग**
शासन निर्णय क्र. अधिनियम-२०११/ प्र.क्र.५९/रोहयो १०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दि. २६ ऑगस्ट, २०१४

वाचा: १) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारणा २०१४)
२) दि. २६ जून, २०१४ चे महाराष्ट्र शासन राजपत्र
३) अधिसूचना क्रमांक: अधिनियम-२०११/प्र.क्र. ५९/रोहयो-१०; दि. २४ जुलै, २०१४.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ यापूर्वी दि. १६ ऑगस्ट, २०१० रोजी सुधारित करण्यात आला होता. तद्नंतर राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करतांना गेल्या चार वर्षात क्षेत्रीय स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे, तसेच राज्य कायदा केंद्रिय कायद्याशी सुसंगत करण्यासाठी अधिनियमामध्ये सुधारणा तसेच काही बदल अपरिहार्य होते. यास्तव, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये दि. २६ जून, २०१४ च्या अधिसूचनेप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत व दि. २५ जुलै, २०१४ पासून लागू करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सुधारित अधिनियमाच्या तरतुदींचा वापर करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ ची अंमलबजावणी राज्याच्या ग्रामीण भागात सुरु आहे. सन २००५ मध्ये केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम पारीत केला व त्यानुसार राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्रीय कायद्याशी राज्य कायदा

सुसंगत करण्यासाठी राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम सन २००६ व सन २०१० मध्ये सुधारित करण्यात आला आहे. परंतु त्यानंतर गेल्या ४ वर्षांत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यात अंमलबजावणी करताना क्षेत्रीय स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणी विचारात घेऊन तसेच कायद्यातील तरतुदीमध्ये सुसंगतता व सुस्पष्टता आणण्यासाठी तसेच काही अधिकाऱ्यांना वैधानिक दर्जा देण्यासाठी कायद्यामध्ये पुनर्सुधारणा करण्यात आलेली आहे. यास्तव, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुधारणा करुन सदर अधिनियम दि. २५ जुलै, २०१४ पासून राज्यात लागू करण्यात आलेला आहे. राज्य रोजगार हमी योजना कायद्याच्या पुनर्सुधारणांमधील महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत:-

(१) **<u>कुटुंब हा घटक रोजगाराकरीता प्रमाणभूत {कलम ३}</u>** :- प्रौढ व्यक्तींऐवजी कुटुंब हा घटक रोजगाराकरीता प्रमाणभूत ठरविलेला आहे आणि तशा प्रकारची सुधारणा कलम ३ मध्ये करण्यात आलेली आहे.

(२) **<u>अधिनियमाखालील योजना {नव्याने प्रविष्ट कलम ३ अ, ३ ब}</u>** :- कलम ३ अ (१) नुसार प्रत्येक कुटुंबाला एका वित्तीय वर्षात हमी दिलेला रोजगार पुरविण्यासाठी योजना तयार करण्याची तरतुद करण्यात आली आहे. योजनेची किमान वैशिष्ट्ये अनुसूची-२ मध्ये तसेच योजनेखाली हमी दिलेल्या ग्रामीण रोजगारासाठी शर्ती व कामगारांचे किमान हक्क अनुसूची ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत. म्हणून अनुसूची-२ व ३ योजनेचा भाग म्हणून समजण्यात यावा.

(३) **<u>जिल्हा कार्यक्रम समन्वयक {कलम ६-१ अ (१)}</u>** :- कलम ६-१ अ (१) नुसार जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून पदनिर्देशित करण्यात येत आहे.

(४) **सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक{कलम ६-१ अ (४)}** :- कलम ६-१ अ (४) नुसार जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्ह्याचे सह कार्यक्रम समन्वयक म्हणून म्हणून पदनिर्देशित करण्यात येत आहे.

(५) **<u>कार्यक्रम अधिकारी{कलम ६-१ ब (१)}</u>** :- कलम ६-१ ब (१) नुसार तालुक्याचे तहसिलदार यांना तालुका/गट स्तरावरील योजनेच्या अंमलबजावणी करिता कार्यक्रम अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येत आहे.

(६) **<u>सह कार्यक्रम अधिकारी {कलम ६-१ ब (१)}</u>** :- कलम ६-१ ब (१) नुसार पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांना तालुका/गट स्तरावरील योजनेच्या अंमलबजावणीकरिता सहकार्यक्रम अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येत आहे.

(७) **<u>विशेष कार्यक्रम अधिकारी {कलम ६-१ ब (१)}</u>** :- कलम ६-१ ब (१) नुसार तालुक्यामध्ये नियुक्त केलेल्या विशेष कार्यक्रम अधिकारी यांना तालुका/गट स्तरावरील योजनेच्या अंमलबजावणीकरिता विशेष कार्यक्रम अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येत आहे.

(८) **<u>मगांराग्रारोहयो राज्य निधी, महाराष्ट्र {कलम १२-अ (१)}</u>** :- कलम १२-अ (१) च्या तरतुदीनुसार शासन निर्णय क्रमांक - मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.१३/रोहयो-१४; दि. १० ऑक्टोबर, २०११ अन्वये "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र" घटीत करण्यात आलेला आहे. यामध्ये केंद्राकडून प्राप्त होणारा निधी आणि केंद्रिय अधिनियमाच्या कलम २२ अन्वये राज्य शासनाचे अंशदान हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र यामध्ये जमा करण्यात येईल आणि त्याचा विनियोग "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निधी असोसिएशन (महाराष्ट्र)" यांच्यामार्फत करण्यात येईल.

(९) **<u>नागरी क्षेत्रातील योजना {कलम १२-ड}</u>**:- महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ सुधारणा २००६ नुसार 'क' वर्ग नगर परिषद/नगर पंचायतीमध्ये राज्य निधीतून कामे घेता येतात. केंद्रीय कायद्यात अशी तरतूद नाही. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रात समाविष्ट असलेल्या 'क' वर्ग नगरपालिकांचा भाग स्वतंत्र करुन नागरी क्षेत्रातील योजना अंमलबजावणीबाबतची तरतुद सुधारीत कायद्यातील कलम १२-ड अन्वये करण्यात आली आहे.

(१०) **<u>बेरोजगार भत्ता {कलम ३ ड}</u>** :- महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मधील अस्तित्वात असलेल्या बेरोजगार भत्ता प्रदानाच्या तरतुदीमध्ये केंद्रीय कायद्यानुसार सुधारणा करुन सुधारीत कायदा, २०१४ च्या कलम ३-ड नुसार बेरोजगार भत्ता प्रदानाची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(११) **<u>योजनेच्या अंमलबजावणीसाठी आयुक्त, नरेगा यांना पर्यवेक्षण व आढाव्यासाठी शक्ती प्रदान करणे {कलम १३-अ (३)}:-</u>** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या कलम १३-अ (१) नुसार विभागीय आयुक्त, महसूल यांना योजनेच्या अंमलबजावणीवर पर्यवेक्षण व देखरेख ठेवण्यासाठी आणि आढावा घेण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. यापुढे कलम १३ अ (३) अन्वये विभागीय आयुक्तांच्या सोबत आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र आयुक्तालय, नागपूर यांनाही उपरोक्त अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१४०८२६१२५१३५७८१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(आर. विमला)**
**उप सचिव (रोहयो)**
26/8/2014

प्रत-: १) मा. राज्यपालांचे सचिव,

२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,

५) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र आयुक्तालय, नागपूर.

७) सर्व विभागीय आयुक्त,

८) सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून),

९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१०) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर

११) आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे,

१२) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे,

१३) संचालक, फलोत्पादन, पुणे,

१४) संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे

१५) संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

१६) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

१७) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

१८) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) विभाग, पुणे

१९) उप सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ रोजगार हमी समिती, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,

२०) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो),

२१) सर्व जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी,

२२) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत

२३) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो),

२४) निवडनस्ती/रोहयो-१०

.....................................